दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ४२ गुरूवार दि.१४ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# राहुल गांधींची 'मृत' लोकांसोबत 'चाय पे चर्चा'

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी निवडणूक आयोगावर 'मत चोरी'चा गंभीर आरोप केला आहे. मागील काही दिवसांपासून देशभरात या मुद्द्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान, आता राहुल गांधी यांनी आपल्या दिल्लीतील निवासस्थानी अशा लोकांची भेट घेतली, ज्यांची नावेच मतदार यादीत नाहीत. हे लोक म्हणतात की, आम्ही तपासणी केली तेव्हा आम्हाला कळले की, आम्ही मृत आहोत. त्यावर राहुल गांधी म्हणतात निवडणूक आयोगाने तुम्हाला मारले आहे.

राहुल गांधींनी कागदोपत्री मृत झालेल्या काही लोकांची भेट घेतली. या भेटीचा व्हीडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. व्हीडीओ शेअर करताना त्यांनी लिहिले की आयुष्यात अनेक मनोरंजक अनुभव आले आहेत, परंतु 'मृत लोकां'सोबत चहा पिण्याची संधी कधी मिळाली नाही. या अनोख्या अनुभवाबद्दल राहुल गांधींनी मानले आयोगाचे आभार.

निवडणूक आयोगाने मृत घोषित केले

व्हीडीओमध्ये राहुल गांधी काही लोकांना भेटून म्हणतात की मी ऐकले की, तुम्ही लोक जिवंत नाही आहात? तुम्हाला मृत घोषित केले आहे. आपण मृत आहोत, हे तुम्हाला कसे कळले? त्यावर उपस्थितांपैकी एकजण म्हणतो आम्ही मतदार यादी तपासली, त्यात आमचे नावच नव्हते. त्यानंतर आम्हाला समजले की, कागदावर आम्हाला मृत घोषित केले आहे. त्यावर राहुल म्हणतात, निवडणूक आयोगाने तुम्हाला मारले आहे.

एका पंचायतीत किमान ५० मृत लोक

यावेळी राहुल गांधींनी विचारले की मृत घोषित झालेले किती लोक आहेत? त्यावर एक व्यक्ती सांगतो एका पंचायतीत किमान ५० लोक मृत आहेत. व्हीडीओनुसार, हे लोक राघोपूर विधानसभा मतदारसंघातील आहेत, जो तेजस्वी यादव यांचा विधानसभा मतदारसंघ आहे.



## स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

लातूर :- भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.०५ वाजता मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होईल.



या कार्यक्रमाला सर्वांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी १५ मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. इतर सर्व कार्यालये, संस्था यांना ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करावयाचा असल्यास, त्यांनी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३५ पूर्वी किंवा सकाळी ९.३५ वाजल्यानंतर ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आरपीआयच्या केज तालुका उपाध्यक्षपदी बाळासाहेब ओव्हाळ यांची निवड

केज/प्रतिनिधी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या आरपीआय पक्षाच्या केज तालुका उपाध्यक्षपदी बाळासाहेब ओव्हाळ यांची निवड करण्यात आली आहे. सध्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपालिके सह विविध स्थानिक संस्थांच्या निवडणुका जवळ आलेल्या आहेत पक्ष बांधणी व पक्ष वाढविण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशावरून युवा प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने बाळासाहेब ओव्हाळ हे गेल्या अनेक वर्षापासून सतत आरपीआय पक्षामध्ये एकनिष्ठ



कार्यकर्ता म्हणून काम करत आहेत. पक्ष्यांचे विचार तळागाळात पोहोचून गोरगरिबांचे प्रश्न तळमळीने सोडवण्याचे काम करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी बाळासाहेब ओव्हाळ यांची केज तालुका उपाध्यक्षपदी निवड केली आहे. यावेळ प्रत्येक प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, जिल्हा सचिव राजू जोगदंड, मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा सल्लागार उत्तम आप्पा मस्क, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, ज्येष्ठ नेते ईश्वर भाऊ सोनवणे, केस तालुकाध्यक्ष दीपक कांबळे, विकास आरकडे आनंद ओव्हाळ यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बाळासाहेब ओव्हाळ यांना निवडीचे पत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## एमएसएफ च्या कर्मचाऱ्यांनी रुग्णाच्या पतीला मारहाण प्रकरणी विविध संघटना व पक्ष पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने घेतली वैद्यकीय अधिष्ठाता यांची भेट.

### मारहाण प्रकरणी तिन सदस्यीय चौकशी समिती गठित लवकरच होणार कायदेशीर कारवाई...

लातूर / प्रतिनिधी :- विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालय येथे काल दिनांक १२ ऑगस्ट रोजी प्रस्तुतीसाठी रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णाच्या पतीला एमएसएफ च्या सुरक्षारक्षकांनी गेटवरच अडवून बेदम मारहाण केल्याप्रकरणी विविध सामाजिक संघटना व पक्ष पदाधिकारी यांच्या शिष्टमंडळाने रुग्णालयाचे अधिष्ठाता उदय मोहिते यांची आज दिनांक १३ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता भेट घेऊन सदर प्रकरणी तात्काळ चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी. त्यांना सेवेतून कमी करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. या मारहाणीचे पडसाद जिल्ह्यात जोरात उमटले असून सर्व स्तरातून संताप व्यक्त केला जात आहे एम एस एफ म्हणजे महाराष्ट्र सेक्युरिटी फोर्स अर्थात महाराष्ट्र सुरक्षा बल यांच्याकडे रुग्णांना व वैद्यकीय अधिकाऱ्यांना सुरक्षा प्रदान करण्याचे काम आहे पण त्यांचे भलतेच काम सुरू असल्याने संतप्त झालेल्या विविध सामाजिक संघटना व पक्ष पदाधिकारी यांनी हे निवेदन दिले आहे तर दोषीवर कारवाई न झाल्यास उग्र स्वरूपाचे आंदोलन करू असा इशारा यावेळी सुनील बसपुरे महानगर प्रमुख शिवसेना उबाटा, महादूभाऊ रसाळ अध्यक्ष लोकनायक सामाजिक संघटना, भिम आर्मीचे प्रदेशाध्यक्ष अक्षय धावारे, महाराष्ट्र आर्यन सेनेचे अविराजे निंबाळकर, रावण साम्राज्य संघटना, ब्ल्यू पँथर संघटना, शहिद अहेमद खान पठाण कृती समिती यांनी दिला आहे. दरम्यान रुग्णालयाचे अधिष्ठाता मोहिते यांनी वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांची तीन सदस्यीय चौकशी समिती गठीत करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे समितीला सांगितले आहे. निष्पन्न होणाऱ्या या अहवालात दोषीवर तात्काळ कारवाई केली जाणार असून त्याचा अहवाल पोलीस प्रशासनाला पाठवण्यात येणार आहे असे यावेळी अधिष्ठाता मोहिते यांनी सांगितले.

## डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार.

लातूर :- लातूर येथील सामान्य रुग्णालयाची मुख्यमंत्र्यांनी आजच लातूर येथे केली घोषणा गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेल्या लातूरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या जागेचा विषय आज अखेर मार्गी लागला आहे. या जागेच्या मोबदल्यासाठी आरोग्य विभागाला प्राप्त झालेला ३ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी कृषी विभागाच्या १४ मे २०२५ रोजीच्या पत्रानुसार परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला आज वर्ग करण्यात आला. त्यामुळे ही जागा आरोग्य विभागाला हस्तांतरित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंत्रालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर दिनांक १४ मे २०२५ रोजी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाने शासन निर्णय निर्गमित करून आरोग्य विभागाकडील निधी कृषी विद्यापीठाच्या महसूल खाती जमा करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार जिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक सर्वे क्र. ३७



मधील १० एकर जागेच्या मोबदल्यापोटी ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये निधी परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला वर्ग करण्यात आला आहे. लातूरच्या जिल्हा रुग्णालयासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे तसेच आपले मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रभाऊ फडणवीस उपमुख्यमंत्री मा.श्री.एकनाथजी शिंदे व मा.श्री अजितदादा पवार, आरोग्यमंत्री मा.ना. श्री प्रकाशजी आबिटकर व विशेषतः लातूरचे पालकमंत्री मा.ना.श्री.शिवेंद्रसिंहराजे भोसले व महायुती सरकारचे खूप खूप आभार..!

## लातूरचा ज्युडोपटू प्रिन्स*विलास *सोनवणेची राज्य स्तरावर निवड .

लातूर :- लातूर शहरातील श्री बसवेश्वर महाविद्यालयात निवड चाचणी घेतली गेली.लातूर जिल्हा सब ज्युनियर ज्युडो कुस्ती चॅम्पियन शीप निवड चाचणीतून १४वर्षाखालील वयोगटातून ३५किलो वजनी गटातून प्रिन्स विलास सोनवणे याची निवड त्याच्या जिगरबाज,मेहनती आणि जिद्दी खिलाडू वृत्तीने निवड झाली आहे.प्रिन्सची ही निवड सलग दुसऱ्यांदा झाली आहे.यासाठी सुरेंद्र कराड सर,आशिष क्षीरसागर सर,संपत साळुंखे सर,चेतन जावळे सर,शिवराज हाके सर,शाळेतील प्रशिक्षक मुकेश बिराजदार सर,यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश प्राप्त झाले आहे.तो स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी आहे.असे त्याचे आईवडील प्रिया विलास सोनवणेंनी सांगितले. राज्यस्तरीय सब ज्युदो चॅम्पियनशिप स्पर्धा प्रथमच लातूर शहरात याच महिन्यात संपन्न होणार आहे.त्यामुळे खरच लातूरचा प्रिन्स सोनवणे लातूरचे प्रतिनिधित्व करताना दिसणार आहे.त्याचे अभिनंदन करताना जेएसपीएम शिक्षण संस्थेचे संचालक अजीत पाटील कव्हेकर,विष्णू सोनवणे,मानसी सोनवणे,विलास घारगावकर,प्राचार्य गोविंद शिंदे,प्राच्यार्य डॉ.संजय गवई,मधुकर सोनवणे,प्रा.डॉ.लहू वाघमारे,प्रा.बापू गायकवाड,डॉ. विजय अजनीकर,सुजाता अजनीकर,ॲड सचिन कांबळे, सुशीलकुमार चिकटे,आशाताई चिकटे,बसवंतप्पा उबाळे,शेप सर,मुख्याध्यापक एस.एन.गायकवाड यांचासह अनेकांनी प्रिन्सचे अभिनंदन केले



## संकटाचा काळ हा प्रत्येकाचा ठरलेला असतो...! समाजभूषण उत्तमराव तरकसे

बीड:- तालुका किल्ले धारूर येथील आसरडोह ग्रामपंचायतच्या प्रांगणात कै. तुकाराम ज्ञानज्योत सामाजिक बहुउद्देशीय संस्था, आसरडोहच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व विद्यार्थी दत्तक सोहळा तसेच समाजभूषण मा श्री उत्तमराव दासु तरकसे यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम श्री हनुमंत घाडगे (सेवानिवृत्त शिक्षक ), श्री मंगल (काकी) देशमुख (सरपंच, असरडोह), श्री जी एम गिरी (गटशिक्षणाधिकारी, पं स धारूर), श्री एस एस ओहाळ (मुख्याध्यापक आसरादेवी माध्यमिक विद्यालय, असरडोह), श्री जी व्ही शिंदे (केंद्रप्रमुख, आसरडोह), श्री विके गडदे (केंद्रप्रमुख, अंजनडोह), श्री ए बी काळे (मुख्याध्यापक जि प शा, आसरडोह) व प्रा डॉक्टर श्रीशैल्य तोडकर तसेच गावचे प्रतिष्ठित नागरिक राजेसाहेब देशमुख, उत्तम गडदे, भगवान पाटोळे, शिवाजी काचगुंडे, सोपान काळे, बाबू देवकते, श्री गोविंद शिंदे (मा. चेअरमन) व प्रभू पिंगळे यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला

सदर कार्यक्रमास समाजभूषण श्री उत्तमराव दासु तरकसे हे प्रमुख पाहुणे व सत्कारमूर्ती म्हणून उपस्थित राहून आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी सदर सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी व संस्थापक अध्यक्ष प्रा डॉक्टर तोडकर सर, शंकर तोडकर व तोडकर परिवाराचे आभार मानत



*संकटाचा काळ हा प्रत्येकाचा ठरलेला असतो तो कायम कुठेच मुक्कामाला राहत नसतो असे प्रतिपादन केले. पुढे बोलताना ते म्हणाले परिस्थिती कशीही असो जगण्यासाठी हिंमत कायम ठेवली पाहिजे..!

कारण योग्य वेळ आल्यावर आंबट कैरी सुद्धा गोड आंब्यात परिवर्तित होते..!

अशा समाज प्रबोधनात्मक विचाराने त्यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक प्रा डॉ. श्रीशैल्य तोडकर यांनी केले. कार्यक्रमास आसपासच्या परिसरातील व असरडोह मधील बहुतांश हजार बाराशेच्या जनसमुदायाने ग्रामपंचायतचे प्रांगण अगदी खचून भरले होते. उत्तम असे सूत्रसंचालन श्री आशरफ पठाण यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार श्री बालाससाहेब चवार यांनी मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## संपादकीय

# निवडणूक आयोगाची कसोटी

लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर इंडिया आघाडी तशी निष्क्रियच राहिली होती. इंडिया आघाडीतून 'आप' बाहेर पडला. लोकसभा निवडणुकीनंतर झालेल्या हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्ली विधानसभा निवडणुकांत भाजपचा विजय झाला. लोकसभा निवडणुका होऊन वर्ष उलटून गेले असून, लवकरच बिहार विधानसभेच्या निवडणुका आहेत. निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) हाती घेतली असून, त्याविरोधात काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाचे तेथे मोठे अभियान सुरू आहे. संसदेत याविषयी चर्चा केली जावी, अशी मागणी विरोधी पक्षांनी वारंवार केली. त्यावर मार्ग निघत नसल्याने आघाडीच्या नेत्यांनी ही लढाई रस्त्यावर आणली. कथित मतचोरी आणि बिहारमधील एसआयआर मोहीम या मुद्द्यांवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीने सोमवारी संसद भवनातून मोर्चा काढला. ३०० खासदार सहभागी झाले. याचा अर्थ त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. 'आप'चे खासदारही या मोर्चात सहभागी झाले, हे विशेष! आंदोलनाच्या निमित्ताने विरोधकांचे ऐक्य पाहायला मिळाले. वास्तविक हा मोर्चा संसदेपासून काही अंतरावर असलेल्या निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत जाणार होता; पण मोर्चासाठी रितसर परवानगी नसल्याचे कारण देत पोलिसांनी तो अडवला आणि सर्व ज्येष्ठ नेत्यांना ताब्यात घेतले.

विरोधी खासदार प्रत्यक्ष भेट देऊन निवेदन देणार असल्याचे पत्र काँग्रेस खासदार जयराम रमेश यांनी आयोगाला पाठवलेही होते. ३० प्रतिनिधींसह भेटण्यास यावे, असे पत्रही आयोगाने दिले होते; मात्र मोर्चातील सर्वच खासदार आयोगाला भेटतील अन्यथा कोणीही निवडणूक आयुक्तांची भेट घेणार नाही, असा निर्णय झाला. कोणत्याही राजकीय, सामाजिक वा कामगार आंदोलनात मोर्चा अडवल्यानंतर संबंधितांच्या प्रतिनिधींनाच सरकारतर्फे चर्चेला बोलावले जाते. या मोर्चात एरव्ही काँग्रेसशी फारकत घेऊन वावरणारे तृणमूल काँग्रेसचे खासदारही सहभागी झाले. तसेच काँग्रेसचे शशी थरूर आणि मनीष तिवारीही मोर्चात होते. 'ऑपरेशन सिंदूर'चा संदेश जगभर पोहोचवण्यासाठी केंद्र सरकारतर्फे पाठवलेल्या शिष्टमंडळात या दोघांचाही समावेश होता.

काँग्रेस नेतृत्वच त्यांच्याकडे संशयाने पाहत असल्याची चर्चा होती. संसदेच्या बाहेर हे आंदोलन सुरू असताना सोमवारी केंद्राने कोणत्याही चर्चेविना लोकसभेत चार व राज्यसभेत तीन अशी एकूण सात विधेयके वेगाने संमत करून घेतली. त्यामधील सर्वात महत्त्वाच्या अशा सुधारित प्राप्तिकर विधेयकाचा समावेश होता. तसेच कर प्रणाली, क्रीडा, डोपिंगविरोधी, मणिपूर वस्तू व सेवा कर दुरुस्ती, व्यापारी जहाज वाहतूक आणि गोव्यातील अनुसूचित जमातीसंदर्भातील एक अशी विधेयके मंजूर झाली. गोंधळात आणि घाईघाईत विधेयके संमत करण्यास राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी विरोध केला; पण विरोधकांनी सभागृहातील गदारोळ झाला तेवढा पुरे झाला, आता केंद्र सरकार विरोधकांकडे लक्ष देणार नाही. विधेयके संमत केली जातील, असे केंद्रीय मंत्री व राज्यसभेतील गटनेते जे. पी. नड्डा यांनी ठणकावून सांगितले.

वास्तविक विरोधी पक्षांनी सातत्याने कामकाज रोखणे जसे चूक, तसेच कुठलीही चर्चा न करता विधेयके मंजूर करणेही योग्य नव्हे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांतील ज्येष्ठ सदस्यांनी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीच्या वेळी वा अन्यत्र एकमेकांशी संवाद साधून सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे कसे चालेल, हे पाहिले पाहिजे. निदान महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा असताना कामकाज सुरळीत चालवण्याचे आश्वासन देऊन विरोधकांनी ते पाळलेही पाहिजे. लोकांच्या जीवन-मरणाशी संबंधित असलेली विधेयके चर्चा व दुरुस्तीखेरीज मंजूर होणे, हे योग्य नव्हे.

गेल्या आठवड्यात राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेऊन कर्नाटकातील एका मतदारसंघात मतचोरी झाली असल्याचा आरोप करत काही पुरावेही सादर केले. निवडणूक आयोगाने डिजिटल मतदार यादी तसेच मतदानाच्या वेळचे सीसीटीव्ही फुटेज द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. आयोगाच्या कारभारात पारदर्शकता असली पाहिजे, अशी अपेक्षा करण्यात काहीही चूक नाही. बनावट मतदार, खोटे व अवैध पत्ते असलेले मतदार, एकाच पत्त्यावर भरमसाट मतदारांची नोंद, अवैध फोटो आणि फॉर्म सहाचा गैरवापर असलेले मतदार अशा पाच माध्यमांतून मतचोरी होत असल्याचा आरोप त्यांनी केला. राहुल गांधी यांनी शपथपत्रावर आरोप करावेत, असे उत्तर निवडणूक आयोगातर्फे त्यांना दिले गेले. सत्ताधारी पक्षाचे नेते याचप्रकारचे मत मांडत आहेत. शपथपत्राच्या आधारे केलेले आरोप खोटे ठरल्यास एक वर्षाची तुरुंगवासाची शिक्षाही होऊ शकते; पण अशी मागणी करणे चूक असल्याचे मत लोकसभेचे माजी महासचिव आणि घटनातज्ज्ञ पी. डी. टी. आचार्य यांनी व्यक्त केले. शिवाय राहुल हे विरोधी पक्षनेते असून, त्यांनी हे आरोप संसदेत केले आहेत.

सदर आरोपांना निवडणूक आयोगाने योग्य ती उत्तरे देणे आवश्यक होते, असेही त्यांचे प्रतिपादन आहे. मुळात आयोगाच्या वतीने सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांनी वा मंत्र्यांनी उत्तरे देण्याचे काहीच कारण नाही. चंदीगड महानगरपालिकेच्या निवडणुकीत निर्वाचन अधिकार्यानेच गैरप्रकार केल्याचे न्यायालयातच सिद्ध झाले होते. तसेच पश्चिम बंगालमधील गडबडी करणार्या चार निवडणूक अधिकार्यांना काही दिवसांपूर्वीच निलंबित केले गेले. बिहारमधील मतदार यादीसंदर्भात खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. राहुल गांधी यांनीही एका मतदारसंघात झालेल्या कथित मतचोरीवरून देशातील सर्वच मतदारसंघांमध्ये असे प्रकार झाले असतील, असे मानणे गैर होईल. आयोग ही घटनात्मक स्वायत्त संस्था असून, तिच्या कार्यपद्धतीत सुधारणा होणे आवश्यकच आहे; मात्र निवडणुकांबद्दल सतत पुराव्याविना शंका घेण्याची वृत्ती लोकशाहीला मारक. देशातील स्वायत्त संस्थांबद्दल सरसकटपणे अविश्वासाची भावना जनमानसात रुजवणे धोकादायक ठरेल. आजवरचा आयोगावरील विश्वास कायम राखण्याची जबाबदारी अर्थातच सरकार आणि विरोधकांची असली, तरी निवडणूक आयोगाने आपली स्वायत्तता कायम राखताना विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर द्यायला हवे.

# मी...... असे स्पष्ट करतो की, फेसबुक वर मुर्ख बनलो...

फेसबुकवर एक पोस्ट व्हायरल होत आहे मी नाव असे स्पष्ट करतो की माझा फोटो, वैयक्तिक माहिती वगैरे फेसबुक वापरणार नाही रात्री वेळ (अनेकांच्या प्रोफाइल वर) वेगवेगळा, ही बातमी टिव्हीवर प्रसारित करण्यात आली आणि स्वतः ची माहिती सुरक्षित राहण्यासाठी बहुतांश फेसबुक वापरणाऱ्या लोकांनी शिक्कामोर्तब केले आहे. हे बघून खरंच हसु आले आणि स्वतःला सुशिक्षित, हुशार, चतुर समजणारे लोकही स्वतः मेंदूचा वापर करत नाहीत हे बघून त्यांच्या बुद्धीची किवही आली. सदर लेख कोणालाही कमी लेखण्यासाठी अजिबात नाही. परंतु चुकिची फसवी आणि हास्यास्पद पोस्ट लोक सहज फॉरवर्ड करतात पण एखादी महत्वाची, एखाद्याला फायदा होईल, रोजगार, शैक्षणिक पोस्ट शेअर करायला लोकांना कमी पणा वाटतो. आणि बुद्धी तपासण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पोस्ट फॉरवर्ड करून आपण मेंदूचा वापरच करत नाही हे स्वतः च सिद्ध करून देतो. तेव्हा त्या शिक्षणाचा, बुद्धीचा आणि हुशारीचा फायदा नेमका कोणाला हा महत्त्वाचा प्रश्न बाजूला राहतो. फेसबुक वर फिरणारी पोस्ट शंभर टक्के चुकिची आहे. ही चुकिची पोस्ट आहे हे सर्वांना कळते फक्त थोडा मेंदुचा वापर करावा लागतो. पोस्ट मधील एक एक मुद्दा समजून घेऊया. मुद्दा क्रमांक एक उद्या एक महत्वाचा दिवस आहे ज्यावर रात्री (वेळ)अधिकृत पणे शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या वाक्याचा अर्थ तरी करतो कळतो. महत्त्वाचा दिवस म्हणजे नेमकं काय? शिक्कामोर्तब कशावर केला? कोणी केला? शिक्कामोर्तब झालेले कागदपत्रे कुठे आहेत? या प्रश्नांची उत्तरे कोणाकडे ही नाहीत. मुद्दा नंबर दोन ही बातमी टिव्हीवर प्रसारित करण्यात आली आहे. तर कोणत्या टीव्हीवर प्रसारित करण्यात आली? कोणत्या व्यक्तीने बघितली? उत्तर नाही. फेसबुक चे नवीन नियम लागु होतात जे तुमचे फोटो वापरण्याची परवानगी देतात. फेसबुक चे नवीन कोणते नियम तयार झाले याची यादी कोणाकडे आहे? उत्तर नाही. हा मँसेज कॉपी करा आणि फेसबुक वर पेस्ट करा जो करणार नाही त्याची फोटो शेअर करायला परवानगी आहे असे समजले जाईल. मँसेज कॉपी करून फेसबुकवर टाकायचा तेव्हा फोटो चा वापर होणार नाही हे खरे की खोटे नंतर बघु हे मँसेजचे फॉरमॅट दिले कोणी? उत्तर नाही. गोपनियतेचे उल्लंघन केल्यास केल्यास कायदेशीर परिणाम होऊ शकतात.. गोपनियतेचे उल्लंघन कोण करणार? कायदेशीर परिणाम कसे होऊ शकतात? शिक्षण आरोग्य सरकारने मोफत द्यायला पाहिजे पण हे विकत घेणाऱ्या लोकांना खरंच किती कायदेशीर बाबी माहिती आहेत हा संशोधनाचा प्रश्न आहे. मी मेटाला परवानगी देत नाही असे लिहणाऱ्या लोकांच्या मेंदुची खरचं किव येते. कारण तुम्ही फेसबुकवर प्रोफाइल वर काहीही लिहले तरी काही फरक पडत नाही फक्त आपण बुद्धीने किती गरीब आहोत हेच सिद्ध होते. चला आपण गोपनियते बद्दल बोलुया. फेसबुकच नव्हे तर इतर कोणतेही अँप नवीन नोंदणी करताना आपल्या कडून परवानगी घेतली जाते. आपल्या हातात असलेला मोबाईल थोडाही सुरक्षित नाही. फोटो, व्हिडीओ, कॉन्टॅक्ट नंबर, लोकेशन सह इतर बऱ्याच बाबी वेगवेगळ्या अँपद्वारे वेगवेगळ्या लोकांकडे आहेत. म्हणुनच आपल्याला आपण फोनवर बोलतो ते, मोबाईल बघतो तेच वारंवार समोर येते, जागा बदलली की लोकेशन दाखवते हे याला गुपित म्हणायचे का? आपल्या मोबाईल मध्ये आपण बऱ्याच वेळा माहिती भरतो तर आपले नाव, मोबाईल नंबर, मेल आयडी, बऱ्याच लोकांचे बँक अकाऊंट नंबर आपोआपच येतात. याला गोपनीयता म्हणायचे का? आपल्याला कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य कधी येणार? अशा पोस्ट द्वारे फक्त आपण आपल्या बुद्धीचा वापर करतो की नाही हे सायबर क्रिमिनल बघत असतात. आपण आपली गोपनीयता आणि बौद्धीक पातळी सार्वजनिक करतो म्हणून अनेक ऑनलाइन फसवणूकीचे प्रकरण वाढले आहेत. गोपनियतेच्या गोष्टी कोण करते तर बाहेर जाऊन चहा जरी पिला तर ते सोशल मिडीयाला शेअर करतात ती गोपनियता? फिरायला गेले तर प्रत्येक ठिकाणची फोटो शेअर करतात, बेडरूम मधील फोटो शेअर करणाऱ्यांनी गोपनियते बद्दल फेसबुक वर लिहणे म्हणजे खरचं बुद्धीची कसोटीच असते. चुकिच्या, हास्यास्पद ज्यातून आपणच आपली बुद्धी वापरत नाही असे मँसेज फॉरवर्ड करताना स्वतः ची छाती फुगते पण खरचं एखादी प्रबोधनात्मक पोस्ट, एखादी रोजगार, शिक्षण, आरोग्य यासंदर्भात कोणातरी फायदा होणारी पोस्ट शेअर करतांना मात्र कमीपणा वाटतो. एखादी चांगली पोस्ट शेअर झाली तर कोणाचा तरी लाखों रुपयांचा फायदाच होईल म्हणून न पाठवणारे जळकुटे लोक फेक पोस्ट पाठवण्यात माहीर असतात. परंतु फेक पोस्ट फॉरवर्ड करून स्वतः स्वतः चे हसू करून घेतो हे याचे सुद्धा भान राहत नाही. मागे अशीच एक पोस्ट व्हाट्सएपच्या संदर्भात फिरत होती. अनेकांनी ती शेअर करून स्वतः ची छाती फुगवली पण स्वतः ची बौद्धिक पातळी सर्वांना दिसली. बऱ्याच वेळा महापुरुषांच्या नावाने पोस्ट येतात हा दोन नंबर तुम्ही मत देऊन एक नंबर वर आना अर्थात एक नंबर व तिन नंबर वर कोण असते हे यांना माहिती नसते आणि हे महापुरुषांना वोट देऊन नंबर देणारे महान विद्वान लोक येथे आहेत. यातून दुसरे काहीच सिद्ध होत नाही तर फक्त आपण सहज मुर्ख बनु शकतो आणि सारासार विचार करत नाही हेच सिद्ध होते. म्हणून शहानिशा करून, आपली बौद्धिक पातळीवर बघून पोस्ट शेअर झाल्या तर मानसाला किंमत राहते व फसवणूक होत नाही. नाहीतर स्वतःच्या च हाताने स्पष्ट करतो मी मुर्ख बनलो आहे..

*****

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# जनसुरक्षा विधेयकापेक्षा विषमतेची दरी मिटविणे हे खरे आव्हान !

पावसाळी अधिवेशनात 'जन सुरक्षा बील' आवाजी मतदानाने संमत झाले. शेवटच्या दिवशी आढावा घेताना मा. मुख्यमंत्र्यांनी या अधिवेशनाच्या उपलब्धीमध्ये 'जन सुरक्षा विधेयकाचा' विशेषत्वाने उल्लेख केला. यापूर्वी या स्वरूपाचे कायदे आंध्र प्रदेश सरकारने 'आंध्र प्रदेश सर्व सार्वजनिक सुरक्षा अधिनियम १९९२' तर छत्तीसगड राज्याने 'छत्तीसगड विशेष जनसुरक्षा आणि अधिनियम २००५' मंजूर केले. या विधेयकामध्ये नक्षलवादी हालचाली रोखण्यासाठी कठोर उपाययोजनांची तरतूद करण्यात आलेली आहे. सशस्त्र नक्षलवाद्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यासाठी पोलिसांना जादा अधिकार देण्यात आलेत. परंतु महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ कायदा आणि इतर राज्यांच्या कायद्यांमधील तरतुदींमध्ये मूलतः फरक आहे. महाराष्ट्र राज्याने तयार केलेल्या कायद्यामध्ये अहिंसात्मक व शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्यावरही नक्षलवादी विचाराने प्रेरित बुद्धिवंत सहाय्य करीत असल्याचा संशय व्यक्त करून त्या आधारे संबंधित तत्सम संघटनेवर (पर्यायाने व्यक्तीवर) कारवाईचे अधिकार मिळणार आहेत. विधेयकातील 'तत्सम' शब्द संदिग्ध असून त्याद्वारे अनेकांच्या पाठीमागे ससेमिरा लागण्याची शक्यता नाकरता येणार नाही. म्हणून एक तर विधेयकातील तो शब्द काढून टाकावा किंवा तत्सम अंतर्गत सरकारला अभिप्रेत असलेल्या घटकांचा स्पष्ट उल्लेख करावा. विधानसभेत भाजपला प्रचंड बहुमत आहे हे मान्यच. जनसुरक्षेच्या नावाखाली कळत नकळत विरोधकांची व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुक्तपणे वापर करून जन प्रबोधन करणाऱ्या पत्रकारांची व लेखकांची गोची करण्याची नीती या विधेयकात दडलेली आहे. तरीही कुठल्याही ( कॉ. विनोद निकोले सोडून) विरोधी आमदाराने हे विधेयक सभागृहात मंजूर होत असताना मौन का पाळले ? 'आम्ही गप्प का राहिलो ?' ह्याचा खुलासा आजपर्यंत केला नाही. आता मात्र डाव्या विचारांचे पक्ष, संघना व काँग्रेस पक्ष देखील रस्त्यावर येऊन निदर्शने, आंदोलने करून विरोध नोंदवित आहेत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने तर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्धार केला आहे. वंचित विकास आघाडीचे अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी विरोधी पक्षांकडून जन संघटनाची फसवणूक झाल्याचा जाहीर आरोप केला आहे. खरं पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या संविधानाच्या अनुच्छेद २१ व ३९ - अ अन्वये मिळालेली जगण्याची व न्यायाची हमी यामुळे कारवाई झालेल्या आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने जामीन देऊन 'बेकायदेशीर कृत्य प्रतिबंध कायदा - १९६७' हा संविधानापेक्षा श्रेष्ठ नाही हे घोषित केले होते. न्यायालयाला संविधानाने दिलेले स्वातंत्र्य आणि स्वायत्तता ही लोकशाहीची फार मोठी देणगी आहे. आणि तीच 'महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४' ला रोखू शकेल असे वाटते. दहशतवाद ही जागतिक समस्या आहे. खरं पाहता समाजात कोणामुळे अस्वस्थता, अशांतता, त्यातून येणारी अगतिकता, हिंसात्मक कृत्ये निर्माण होतात त्यांच्या मुळाशी जाऊन उपायोजना करणे, अशा प्रवृत्तीच्या संघटनेच्या नेत्यांशी वारंवार संवाद करणे व त्यातून समन्वयशील मार्ग शोधणे ह्यावर भर देण्याची आवश्यकता आहे. यापूर्वी असे प्रयत्न आचार्य विनोबा भावे, लोकनायक जयप्रकाश नारायण आणि गांधीवादी नेते डॉ. एस. एन. सुब्बाराव यांनी केल्यामुळेच चंगळघाटीतील डाकूंनी मोठ्या प्रमाणात समर्पण केलं होतं. नक्षलवाद्यांनी केलेल्या दंतवाडा हत्या प्रकरणावर सर्वोदयाचे ज्येष्ठ नेते श्री अमरनाथ भाई, श्री लवणम, डॉ. सुगन बरंठ यांनी समन्वयाच्या दृष्टीने नक्षलवाद्यांशी परिणामकारक संवाद साधला होता. महात्मा गांधीजींच्या हृदय परिवर्तनाच्या मार्गाने अनेक गुंतागुंतीच्या जटील प्रश्नांवर मात करता येते. त्या दृष्टीने सरकारने पुढाकार घेऊन असे संवाद घडवून आणले पाहिजेत. खरं पाहता संघटना स्थापन करणे, शांततेच्या मार्गाने अहिंसक प्रतिकार व आंदोलन करणे हे संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आहेत. त्याची पायमल्ली करणे कुठल्याही शासनाला शक्य नाही. आणीबाणीच्या काळात ज्यांनी शांततापूर्ण व अहिंसात्मक आंदोलन करून जेलमध्ये जाण्याचे साहस दाखवले, त्यांच्या गौरवार्थ शासन आता प्रतिमाह २०,०००/- रुपये मानधन देऊ लागले आहे. तेव्हा संविधानात्मक चौकटीत राहून मूलभूत हक्कांसाठी जी आंदोलने अथवा निदर्शने होतात, ती जन सुरक्षा कायद्याच्या कचाट्यातून सुटावीत ही अपेक्षा ! आपले कायदे येतात. त्यांची भाषा मुलायम व संविधानाच्या चौकटीत बसेल अशीच असते. परंतु त्यांचा सर्रास दुरुपयोग केला जातो. बऱ्याच वेळेस अस्तित्वात असलेल्या कायद्यांची कठोर अंमलबजावणी होत नाही. कायदा कायद्याच्या पुस्तकात सुखरूप असून जनतेचे जटील प्रश्न सुटत नाहीत. प्रचलित कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली तरच जरब निर्माण होऊ शकेल. सारांश, दहशतवाद, नक्षलवाद, समाजातील अस्थिरता यांच्याशी असलेला मूलभूत प्रश्न विषमतेचा! विषमतेमुळे समाजात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक दरी निर्माण होते. समाजाचे संतुलन बिघडते. भेदाभेदामुळे दारिद्र्याची व दैन्याची खाई रुंदावत जाते. म्हणून सरकारने जनसुरक्षा विधेयकापेक्षा आपली सर्व ताकद खदखदणारी विषमता कशी दूर करता येईल त्यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

*********

डॉ. सोमनाथ रोडे,
लातूर मो. ७५१७९८५६९०

# 'इथेनॉल'चा सामान्यांना काय फायदा?

इथेनॉलचे प्रमाण वाढले असले तरी पेट्रोलची किंमत कमी झालेली नाही. इ२० पेट्रोलमुळे पेट्रोलच्या किमतीमुळे सरकार प्रतिलीटर मागे किमान ८ रुपयांची बचत करते.

नुकतेच रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी पुण्यात एका कार्यक्रमानिमित्त आले असताना त्यांनी तिथे उपस्थित असलेल्या लोकांना पारंपरिक इंधनामध्ये इथेनॉल आणि जैवइंधनाच्या मिश्रणाचे फायदे वाचून दाखवले. तो कार्यक्रमदेखील जैवइंधनाशी निगडीत असल्याने त्याबद्दल काहीही आक्षेप नाही. शिवाय पेट्रोलमध्ये इथेनॉलमिश्रित करण्याच्या निर्णयाचा काहीच फायदा झाला नाही, अशातलाही भाग नाही.

साखर कारखान्यात उसाचा उपपदार्थ म्हणून आणि तांदूळ, मका आणि तत्सम धान्यांपासून इथेनॉल तयार होते. देशात इथेनॉल निर्मितीचे दोन प्रमुख स्त्रोत आहेत. त्यापैकी उसाचा उपपदार्थ म्हणून निर्माण होणार्या इथेनॉलचे महत्त्व विशेष आहे.



देशातील शेतकरी मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन करत असतो. या उसाचा वापर साखर आणि गूळ बनवण्यात मुख्यत्वे केला जातो. देशात ऊस लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे देशातील साखर कारखाने मोठ्या प्रमाणात साखरेचे उत्पादन घेत होते. उत्पादित झालेली ही साखर देशाच्या गरजेपेक्षा जास्त असायची, साखरेला मिळणारी किंमत कमी असल्याने आणि साखरेची निर्यात होईलच याची काहीही शाश्वती नव्हती. त्यात शेतकर्यांच्या उसाला द्यावा लागणारा दरदेखील बराच जास्त असल्याने साखर कारखाने तोट्यातच चालले होते. त्यामुळे अनेक शेतकर्यांना त्यांच्या उसाची देणीदेखील मिळत नव्हती.

मात्र, मोदी सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचा निर्णय घेतल्यानंतर हे चित्र बर्यापैकी बदलले. कारखान्यात निर्माण झालेल्या इथेनॉलची विक्री करून साखर कारखान्यांना मोठ्या प्रमाणात भांडवल मिळाले. त्याचा परिणाम असा की गेल्या काही वर्षांत देशातील साखर कारखान्यांनी शेतकर्यांची ९९ टक्के देणी पूर्ण केली आहे. त्यामुळे या इथेनॉल मिश्रणाच्या निर्णयाचा फायदा शेतकरी आणि साखर कारखानदार यांना झाला, हे स्पष्ट आहे. बरं हे इथेनॉल मिश्रणाचे धोरण आणण्यामागे केंद्र सरकारचा मुख्य हेतू म्हणजे इंधन आयातीवरील देशाचा खर्च कमी करणे. भारत एक अवाढव्य देश आहे आणि त्यानुसार त्याला मोठ्या प्रमाणात इंधनाची गरज पडते. मात्र, देशात खनिज तेलाच्या विहिरी अल्प असल्याने आपल्याला ९० टक्क्यांहून जास्त इंधन आयात करावे लागते. ही आयात महाग तर आहेच; पण या आयातीसाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलनाची आवश्यकता भासते. हे परकीय चलन वाचवण्यासाठी केंद्र सरकारने हा इथेनॉल मिसळण्याचा निर्णय घेतला. त्यातून सरकारने हजारो कोटी रुपये आतापर्यंत वाचवले आहेत. सोबतच इंधनात इथेनॉल मिसळल्याने वायूप्रदूषण देखील कमी होते, हाही फायदा आहेच.

म्हणजे एका इथेनॉलचे किमान चार फायदे आपल्याला पहायला मिळाले. मात्र, आता केंद्र सरकार हा इथेनॉलचा फायदा अजून वाढवू इच्छित आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे प्रमाण १० टक्क्यांवर नेण्याचा निश्चय मोदी सरकारने पहिल्या टर्ममध्ये केला होता. त्यात ते यशस्वी देखील झाले. त्यानंतर पुढचा टप्पा म्हणजे पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचा होता. तो टप्पा भारताने ठरवलेल्या कालावधीच्या पाच वर्षे आधी पूर्ण केला. आता सरकार पेट्रोलमधील इथेनॉलचे प्रमाण २७ टक्क्यांवर नेण्याच्या विचारात आहे आणि ते प्रमाण तेवढ्या प्रमाणात वाढवले जाईल यात काडीमात्र शंका नाही.

असा निर्णय घेण्यात काहीही हरकत नाही. मात्र या वाढत्या इथेनॉलचा परिणाम गाडीवर होतो याची जाणीव सरकारला आहे का? हा खरा प्रश्न आहे. भारतात एप्रिल २०२३ पर्यंत बनणार्या सर्व गाड्या या इथेनॉलचे नागण्य प्रमाण झेलण्यासाठी तयार केल्या होत्या. तर त्यानंतर तयार केलेल्या सर्व गाड्या इ२० पेट्रोलवर चालू शकतात. पेट्रोलमध्ये पाणी मिसळत नाही. मात्र, इथेनॉल मिसळते. तर इथेनॉलमध्ये पाणी मिसळते. त्यामुळे इ२० पेट्रोलमध्ये थोडा का होईना पाण्याचा अर्क शिल्लक राहतो.

हे शिल्लक राहिलेले पाणी गाड्यांच्या भागांसाठी धोकादायक आहे. या पाण्याचा परिणाम गाडीच्या इंजिन आणि इतर भागांवर होऊ नये म्हणून त्यात काही बदल करणे आवश्यक असते. इ२० पेट्रोल अजून पाच वर्षे येणार नसल्याने तोपर्यंत तयार झालेल्या गाड्यांकडे बराच काळ रस्त्यावर फिरण्याची संधी होती. मात्र, इ२० पेट्रोल वेळेआधी बाजारात आणल्याने आता या गाड्यांना नुकसान पोहपचण्याची शक्यता आहे. आता या नुकसानाची जबाबदारी आणि खर्च कोण उचलणार, हा प्रश्न उपस्थित होतो.

यातील बहुतांश गाड्यांमध्ये इंजिन आणि पेट्रोल टाकीतील काही भाग बदलून ती वापरली जाऊ शकते. मात्र, दुचाकीसाठी ८ ते १० हजारांचा खर्च अपेक्षित आहे, तर चारचाकी गाड्यांसाठी हा खर्च लाखाच्या घरात जातो. अनेकांसाठी हा खर्च परवडणारा नाही. तर इ२० पेट्रोलमुळे गाडीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो, गाडीला जास्त इंधनाची गरज भासते, तसेच दुरुस्तीचा खर्च वाढतो. म्हणजे नागरिकांना या निर्णयाचा फटकाच बसला आहे. भारतात विकत घेतलेल्या गाडीचे वय किमान १३-१४ वर्षे तरी असते. अशात आता २०२३च्या आधी गाडी विकत घेणारे नागरिक शासनाच्या या निर्णयावर नाराज आहेत.

गाडी विकत घेणे ही बहुतांश नागरिकांसाठी मोठी बाब आहे. अनेक वर्षे पैसे वाचवून, कर्ज काढून अनेक लोक गाडी विकत घेत असतात. पुन्हा दुसरी गाडी केव्हा विकत घेऊ याचा अंदाज नसतो. त्यामुळे शासनाच्या निर्णयामुळे गाडीला काही इजा होणे किंवा नवी गाडी विकत घ्यावी लागल्यास सरकारवर नागरिकांचा रोष आहे. त्यांना विश्वासात न घेता, इ२० पेट्रोल पर्याय न देता किंवा या इ२०चा फायदाही न देता त्यांच्यावर हा निर्णय थोपवला गेल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

इ२०चे धोके आणि शासननिर्णयातील अस्थिरतेमुळे अनेक पेट्रोल गाडी वापरणारे नागरिक आता डीझेल गाड्यांच्या पर्यायाकडे वळत आहेत. देशात सध्या पेट्रोलपेक्षा २.५ ते ३ पटीने जास्त डीझेल लागते, तर डीझेल प्रदूषणाचे प्रमाण जास्त असल्याने जर नागरिकांनी डीझेल गाड्यांचा वापर वाढवल्यास पुन्हा प्रदूषणात वाढ होऊ शकते. त्यामुळे या इथेनॉल मिश्रणाचा फायदा शेतकरी, कारखानदार, सरकार आणि पर्यावरणाप्रमाणे नागरिकांपर्यंत पोहोचणे देखील महत्त्वाचे आहे. तर २०२३ आधी विकत घेतलेल्या गाड्यांचा प्रश्न देखील सरकारला मार्गी लावावा लागणार आहे. नाहीतर अशा निर्णयाविरोधात जनमत तयार होणे, सरकार आणि इथेनॉलचा निर्णय दोन्हींसाठी चांगले नाही.

# लोकशाहीच्या संरक्षणासाठी खासदार रजनीताई पाटील आक्रमक !

केज/प्रतिनिधी राज्यसभेच्या खासदार संसदरत्न, कायम सामाजिक व सर्वसामान्य नागरिकांचे विविध विषय अभ्यासपूर्ण आणि आक्रमकपणे संसदेत मांडणाऱ्या काँग्रेसच्या खा.रजनीताई पाटील यांनी काल इंडिया आघाडीच्या आंदोलनात आक्रमक भूमिका घेतली. निवडणूक आयोगाने घेतलेली एकतर्फी भूमिका ही लोकशाहीला घातक असून काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी अतिशय महत्वाच्या मुद्याला हात घातला असून यासाठी विरोधी बाकावरील सर्व खासदार या आंदोलनात सामील झाले होते.

राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्या खांद्याला खांदा लावून बीड च्या खासदार रजनीताई पाटील या आंदोलनात होत्या अक्षरशः सरकारने पोलिसांच्या दडपशाही ने हे आंदोलन दाबण्याचा प्रयत्न केला परंतु खा. राजनीताई पाटील यांनी महिला खासदार असताना देखील या विरोधाला न जुमानता अडवण्यासाठी टाकलेले बॅरिकेट ढकलून देऊन पुढे जाण्याचा प्रयत्न केला. परंतु भेटण्यासाठी जात असताना, इंडिया आघाडीतील खासदारांना पोलिसांकडून अडवण्यात आले आणि ताब्यातही घेण्यात आले. तरीही त्या मागे हटल्या नाहीत.

मत चोरीच्या विरोधात मोठे आंदोलन केले गेले. मतमोजणीत पारदर्शकता, एतच् + ततझ–ढ ची अनिवार्य पडताळणी आणि मतदार याद्यांतील फेरफार थांबवण्याच्या मागण्यांसाठी



आंदोलन करण्यात आले यावेळी खासदार रजनीताई पाटील आक्रमक झाल्या. ही लढाई राजकीय नाही ही लढाई लोकशाही, संविधान आणि 'एक व्यक्ती, एक मत' या अधिकाराच्या संरक्षणाची आहे ही भूमिका घेतली. लोकशाहीची होत असलेली मुस्कटदाबी विरोधात मोर्चा आक्रमक झाला. खा.रजनीताई पाटील यांनी पुढाकार घेतला.

# आता महानगरपालिकेच्या वतीने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन

लातूर/प्रतिनिधी :– संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी (७५०) जयंती वर्ष २०२५ निमित्त लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आयोजीत करण्यांत आला आहे. दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ यावेळेत गंजगोलाई ते लातूर शहर महानगरपालिका, लातूर पर्यंत संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा/मुर्तीची भव्य पालखी मिरवणूक काढण्यांत येणार आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण –२०२५/प्र.क्र.३६६/नवि–२० दि. ३० जुलै २०२५ नुसार हा कार्यक्रम घेण्यांत येणार असल्याने सदरील कार्यक्रमास सर्वांनी उपस्थिती राहण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केले आहे

# भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. गंगनाथन यांची पंचसुत्री हे मोठी देण–आनंद गायकवाड

केज/ प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती व्याख्यान व चर्चासत्र कार्यक्रम घेवून दिनांक १२ – ०८ – २०२५ रोजी साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून आनंद (भैय्या) गायकवाड हे होते. व्याख्यान देताना ते म्हणाले कि, डॉ. एस. आर. रंगनाथन हे भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक आहेत. त्यांनी मांडलेली पंचसुत्री हा गंथालय शास्त्राचा प्राण आहे. त्यांनी मांडलेली पंचसुत्री हि मोठी देण आहे, डॉ. एस. आर. रंगनाथन मांडलेली पंचसुत्री म्हणजे र्ठीश्री `ष ५ श्ररु चा नावाने आळखले जाते.

१) ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत
२) प्रत्येक वाचकाला त्याच्या आवडीचा व त्याला हवा असलेला ग्रंथ मिळाला पाहिजे.
३) प्रत्येक ग्रंथाला योग्य वाचक मिळाला पाहिजे
४)ग्रंथालयकर्मचा–यांचाववाचकांचावेळवाचलापाहिजे.
५) ग्रंथालय हि .वर्धिष्णू संस्था आहे.

हि देशाला व ग्रंथालय चळवळीला डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी दिलेली अजरामर देण आहे यावरच



१) शालेय – महाविद्यालय – विद्या पिठिय ग्रंथालये
२) सार्वजनिक ग्रंथालये
३ ) संशोधन ग्रंथालये
४ ). राष्ट्रीय ग्रंथालये

यांचा ग्रंथालयीन ढाचा अवलंबून आहे असे प्रतिपादन आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले. त्यानंतर एस. के. वैरागे यांचेही थोडक्यात व्याख्यान झाले. त्यानंतर घेण्यात आलेल्या चर्चासत्रात पांडूरंग गायकवाड, भागवत पौळ, बाळासाहेब गायकवाड, बबन पुंड यांनी मनोगत मांडले. दान्ही सत्राच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड हे होते. अध्यक्षीय समारोपात डॉ. एस. आर. रंगनायन यांचा जिवन – परिचय व कार्य यावर प्रकाश टाकला डॉ. एस. आर. रंगनाथन हे षरींहशी `ष श्ररु (फादर ऑफ लॉ) असल्याचे सांगून त्यांच्या ग्रंथालयीन कार्याचा थोडक्यात आढावा घेतला डॉ. एस. आर. रंगनाथन महान विभूती होवून गेले असे प्रतिपादन डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी अध्यकीय समारोप प्रसंगी प्रतिपादन केले यावेळी माजी सरपंच रामराजे गायकवाड, माजी ग्रा.पं. सदस्य रमेश गायकवाड, आर. ए. गायकवाड, अमोल गायकवाड, नानासाहेब जाधव, आरुण गायकवाड यांच्यासह वाचक, हितचिंतक यांची उपस्थिती होती.

# धनेगाव येथे २५ वर्षांनी एकवटले बालमित्र

केज/प्रतिनिधी बालपणीच्या आठवणीत मैत्रीभाव जोपासण्यासाठी तब्बल २५ वर्षांनी सर्व मित्रांनी एकत्र येत गेट–टुगेदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला बालमित्रानी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



तालुक्यातील धनेगाव येथे १९९९– २००० सातवी बॅचच्या मित्रांनी एकत्र येऊन बालपणीच्या आठवणीना उजाळा देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या इयत्ता सातवीच्या बाल मित्रांनी मेळावा घेत पुन्हा एकदा बालपणीचा आठवणी ताज्या केल्या. शाळेची घंटा वाजवून राष्ट्रगीत,प्रार्थना,परिपाठ घेऊन विद्यार्थ्यानी पुन्हा एकदा बालपणीची शाळा अनुभवली.२५ वर्षापूर्वी ज्ञानदान केलेल्या शिक्षकांवर पुष्पवृष्टी करत त्यांचा सन्मान करत ऋण व्यक्त केले.कार्यक्रमानंतर स्नेहभोजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

यावेळी सण १९९९ – २००० साली कार्यरत असलेले शिक्षक श्री.सोमवंशी,श्री. आरेकर,श्री. हांडीबाग,श्री.निपानिकर,श्री. शिखारे त्याचबरोबर भोसले दत्तात्रय वैजनाथ,नवनाथ जगताप,शिवप्रसाद स्वामी.सुरेखा मुळे,शुभांगी गुजर,स्वाती गुजर,सुनिता गुजर यांच्यासह इतर विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.






### शहर पथ विक्रेता समितीची बैठक संपन्न

# शहरातील पथ विक्रेत्यासाठी समिती सकारात्मक काम करेल - आयुक्त श्रीमती मानसी मीना

लातूर/प्रतिनिधी :लातूर शहर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (ऊ-ध- छ्णड्च् ) अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या शहर पथ विक्रेता समितीची बैठक महानगरपालिका स्थायी सभागृहात आज दिनांक १३.०८.२०२५ रोजी आयुक्त श्रीमती मानसी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

बैठकीत प्रथम उपस्थित सर्व सदस्यांनी आपली ओळख करून दिली आणि सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत करण्यात आले. उपस्थित सदस्यांनी शहरातील फेरीवाले यांचेसाठी काही विशेष काम करावे, समिती सदस्य सुपर्ण जगताप यांनी शहरातील फेरीवाले यांच्या संदर्भात छत्रपती संभाजीनगर मनपाने केलेल्या कार्यवाहीचा विचार करून त्याप्रमाणे आपल्याला काही करता येईल का ते पाहावे असे सांगितले. इतर सदस्यांनी मागील बैठकीतील झोन केलेले याची माहिती द्यावी जेणेकरून त्यात काही सुधारणा सांगता येतील, असे मांडले. यावेळी आयुक्त यांनी समितीमध्ये नवीन सदस्य घेण्यात आलेले आहेत



त्यात फेरीवाला क्षेत्र मध्ये निवडणुकीद्वारे व इतर अशासकीय संघटना, सेवाभावी संस्था या अशा विविध क्षेत्रामधून सदस्य घेण्यात आलेले आहेत त्यांची ही पहिलीच बैठक असल्याने आपण शहरातील फेरीवाले यांचे प्रश्न व अडचणीबाबत त्यांचे मत घेऊ आणि पुढील बैठकीमध्ये समितीकडून सकारात्मक व धोरणात्मक निर्णय घेण्यात येतील, असे सांगितले.

यावेळी बैठकीस उपायुक्त तथा शहर प्रकल्प अधिकारी डॉ. पंजाब खानसोळे , पोलीस अधीक्षक प्रतिनिधी पोलीस उपनिरीक्षक सीमा बेद्रे, वाहतूक नियंत्रण शाखा पोलीस उपनिरीक्षक माधव केंद्रे , क्षेत्रीय अधिकारी संतोष लाडलापुरे ,समाधान सूर्यवंशी, अतिक्रमण विभागप्रमुख रवि कांबळे, वाहतूक नियंत्रण शाखा लक्ष्मण बिरादार , आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था राजगोपाल बाहेती,माधव गायकवाड, सुनिता चाळक, सुपर्ण जगताप, आडत असोशिएशन चंद्रकांत सूर्यवंशी , फेरीवाले सदस्य गौस गोलंदाज, त्र्यंबक स्वामी, मनोज शिंदे, माजीद बागवान, दीपमाला तुपकर, उषा धावारे, वैशाली पडवळ हे उपस्थित होते. शेवटी आभार शहर अभियान व्यवस्थापक लक्ष्मण जाधव यांनी मानले.

### केज उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा




केज/प्रतिनिधी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात आला. जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. स्तनदा मातांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ केंद्रे यांनी स्तनपान या विषयावर मार्गदर्शन केले. आहार तज्ज्ञ सुलक्षणा पाटील यांनी आई व बाळासाठी स्तनपानाचे महत्त्व सांगितले. स्तनदा मातेच्या आहाराविषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती स्त्री रोग तज्ज्ञ इंगोले ,समुपदेशक सीता गिरी यांनी स्तनपानाच्या वेगवेगळ्या पद्धती विषयी स्तनपानाविषयी मार्गदर्शन केले. यावेळी अधिपरिचारिका उपस्थिती होती. चित्रफित,चार्टच्या माध्यमातून मातांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास स्तनदा मातांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लातूरचे धनंजय पवार राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराने सन्मानीत

लातूर :- लातूर जिह्यातील हसाळा (ता.औसा) येथील श्री गुणवंतराव रामचंद्र पाटील सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय पवर यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या राज्यस्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथमित्र पुरस्काराने पत्नी सचिता पवारसह राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोरे यांच्या हस्ते ५० हजारांचा धनादेश,स्मृतीचिन्ह,ग्रंथ व प्रमाणपत्राने दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईच्या एसएनडीटी महिला मुक्त विद्यापीठ सभागृहात सन्मानीत करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्याध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार,उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी,उपसचिव अमोल मुत्याल,ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



ग्रंथमित्र पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करुन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे ४० टक्के अनुदान वाढ,वर्ग बदल,नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात शासन स्तरावर सुरु असलेल्या कारवाईची माहिती देत वाचकांना अधिकाधिक चांगले साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रंथालय चळवळीतील सर्वांनी प्रयत्न करावे असे आवाहन केले.

या कार्यक्रमाला राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील,राज्य कोषाध्यक्ष भीमराव पाटील,राज्य कार्योपाध्यक्ष तथा जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले,जिल्हाध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर, लिपिक हिरालाल पाटील,नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सुर्यवंशी,बाळासाहेब देवणे, जिल्हा ग्रंथालय संघ संचालक किरण बाबळसूरे, अनिल पाटील,दिनकरराव शिंदे,दिपक पाटील,अशोक भोंडे, पंजाबराव थावरे, भागवत जाधव, सुनंदा शिंदे, सीमा थावरे,पोपट भांबरे, वसंत बोजे,दगडू वंगवाड, संजय सूर्यवंशी, किरण कदम, शिवाजी पाटील, रामचंद्र कदम,उध्दव कदम, गुरुपद सावळगे,विश्वनाथ बिराजदार,विद्यासागर हणमंते, ग्रंथमित्र संतोष करमले, प्राचार्य मुळे, गिरीधर जंगाले, विद्याधर गायकवाड, होनमाडे, ग्रंथमित्र श्रीधर स्वामी,महादेव खिचडे,भीमराव पाटील, पवन गिरवलकर, सुधीर चाटे, शिंगडे,रमण पवार, कल्याणी पवार आदींची उपस्थिती होती.

### मुख्याध्यापक डी.पी.कांबळे यांची सेवानिवृत्ती तर मुख्याध्यापक भगवान शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार

लातूर :- शिरोळवांजरवाडा येथील संस्कार वर्धिनी हायस्कूलचे मुख्याध्यापक डी. पी.कांबळे हे दि.३१ जुलै २५ रोजी प्रदीर्घ सेवेनंतर नियतवयोमानाप्रमाणे सेवानिवृत्त झाले असून,लातूरच्या प्रतिभा निकेतन विद्यालयाचे मुख्याध्यापक भगवान शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त,मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतरकर्मचारीसंघटनेच्यावतीनेशनिवार,दि.९ ऑगस्ट २५ रोजी सायंकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे शाल,फेटा,पुष्हार देवून,पेढा भरवून सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक डी. पी.कांबळे व मुख्याध्यापक भगवान शिंदे यांनी संघटनेने पाठीवर आपलेपणाची शाल घालून शुभेच्छा दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या सुरवातीला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन सामूहिक अभिवादन करण्यात आले.त्यानंतर प्रास्ताविकात कार्यक्रमाची माहिती मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पी.आर.शिंदे यांनी विषद केली.आपल्या



संघटनेच्या सदस्य पदाधिकार्यांनी आपल्या सेवाकाळात कर्तव्याचे भान ठेवून कार्य केल्याचा संघटनेला अभिमान असल्याचेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे प्रदेशकोषाध्यक्षबी.जी.बनसोडेयांनीकेले.संघटनेचे राज्य सचिव डी.के.सुरवसे यांनी सत्कारमूर्तींच्या कार्याची आढावा मांडला.माजी मुख्याध्यापक हरिभाऊ कोनाळीकर यांनी आभार मानले.

सदरील कार्यक्रमाला मुख्याध्यापक एस.एन.गायकवाड,के.व्ही.वाघमारे, एस.एस. साळवे, ए.एस.कदम, बी.आर.माने,डी.झेड. गायकवाड, ए.एम.सोनाळे, यु.एम.तलवारे,एस. जे.कांबळे, यशवंत वाघमारे, आर.डी.घोडके आदी मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.







PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE